| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ९८ वा | सोमवार दिनांक २२ जून, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### भांडी स्टोअर्स ॲण्ड फर्निचरचे दुकान फोडले

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अभंग तुळशीराम घोटकर, वय ४८ वर्षे, रा. शिवाजी चौक लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव यांचे जळकोट येथे न्यु लक्ष्मी भांडी स्टोअर्स ॲण्ड फर्निचर दुकानाचे पाठीमागील बाजूचा पत्रा अज्ञात व्यक्तीने दि.१७.०६.२०२६ रोजी काढुन आत प्रवेश करुन दुकानातील एलइडी टीव्ही ९ नग, तांबा हंडा ८ नग, तांबा हंडा ७ नग,तांबा घागर १५ नग,पितळी देव म्सि २७० नग,मिक्सर बाजाज कंपनीचे २० नग,तांबा टाकी ५ नग, तांबा अूपल हंडा १३ नग, तांबा कळशी १५ नग, पितळी टोपले ४० नग,पितळी वाटी ६६ नग असे एकुण ८,११,७२० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अभंग घोटकर यांनी दि.१९.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे

### तुळजापूर बस स्थानकातून सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरली

तुळजापुर (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे : फिर्यादी नामे-रुपाली राहुल देशपांडे, वय ४२ वर्षे, रा. वाणी प्लॉट कॅन्सर हॉस्पीटल जवळ बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर या दि.१९.०६.२०२६ रोजी नविन बसस्थानक तुळजापुर येथे तुळजापूर ते बार्शी जाणारे बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून रुपाली देशपांडे यांचे पर्समधील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ४,००० असा एकुण ९९,००० किंमतीचा माल चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रुपाली देशपांडे यांनी दि.१९.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ४०५ कारवाया करुन ३,४०,५००'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१८ जुन रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ४०५ कारवाया करुन ३,४०,५००'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वी करावी ; २८ जून रोजी जिल्हाभर विशेष अभियान जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे आवाहन



धाराशिव (जिमाका)- राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी पाच वर्षांखालील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हा समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच पार पडली.

बैठकीच्या प्रारंभी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीष हरिदास यांनी उपस्थितांचे स्वागत करून मोहिमेची माहिती दिली.त्यांनी सांगितले की, पोलिओ या आजाराचे समूळ उच्चाटन मार्च २०१४ मध्ये झाले असून याबाबत जागतिक आरोग्य संघटनेचे प्रमाणपत्र भारताला प्राप्त झाले आहे.मात्र,काही देशांमधून या आजाराचा धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जागतिक आरोग्य संघटनेच्या निर्देशानुसार केंद्र सरकारकडून दरवर्षी देशभरात एकाच दिवशी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण दिवस आयोजित केला जातो.मतदान प्रक्रियेच्या धर्तीवर या मोहिमेत लाभार्थ्यांना पूर्वसूचना स्लिपचे वितरण,लसीकरण बूथची उभारणी आणि लस दिल्यानंतर बोटावर शाईचे चिन्हांकन करण्यात येते,जेणेकरून एकही पात्र बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही.

जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ.कुलदीप मिटकरी यांनी मोहिमेची सविस्तर माहिती देताना सांगितले की,रविवार,दि.२८ जून २०२६ रोजी धाराशिव जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून त्यासाठी आरोग्य यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे.जिल्ह्यात पाच वर्षांखालील एकूण १ लाख ६३ हजार ३२९ बालके असून त्यांच्या लसीकरणासाठी ग्रामीण भागात १ हजार १०१ आणि शहरी भागात १२५ अशा एकूण १ हजार २२६ लसीकरण बूथची व्यवस्था करण्यात आली आहे.

लसीकरणासाठी ३ हजार ३६८ कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून पर्यवेक्षणासाठी वैद्यकीय अधिकारी,तालुका आरोग्य अधिकारी,जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.बसस्थानके, रेल्वे स्थानके,बाजारपेठा, विटभट्ट्या,साखर कारखाने,यात्रा आणि लग्न समारंभाच्या ठिकाणीही पोलिओ डोस पाजण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.तसेच भटक्या वसाहती आणि ऊसतोड कामगारांच्या वस्त्यांमधील बालकांसाठी विशेष मोबाईल पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी मार्गदर्शन करताना मोहिमेच्या कालावधीत शून्य ते पाच वर्षे वयोगटातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही,यासाठी काटेकोर नियोजन करून मोहीम यशस्वी करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी ग्रामस्तरावर शालेय विद्यार्थ्यांच्या प्रभात फेऱ्यांचे आयोजन करून राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या.सर्व पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेला यशस्वी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीष हरिदास,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) देवदत्त गिरी,जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ.कुलदीप मिटकरी,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.शिवाजी फुलारी,शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.एल.एल.गायकवाड व डॉ. गोसावी,सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.मारुती कोरे,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.बनसोडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.स्मिता गवळी,आयएपीचे अध्यक्ष डॉ.डी. एस.खुणे,आयुर्वेदिक महाविद्यालयाचे डॉ.मनोज बाबर, शिक्षण विभागाचे प्रतिनिधी डी.एम. जंगम व बी.डी.देवगुडे,समाज कल्याण विभागाचे प्रतिनिधी संतोष तांबे,महाराष्ट्र राज्य विद्युत विभागाचे प्रतिनिधी आर. एच.पवार,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रतिनिधी टी.आर. म्हेत्रे,जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रामेश्वर यादव,जिल्हा लेखा व्यवस्थापक जीवन कुलकर्णी,जिल्हा सनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी किशोर तांदळे तसेच गणेश पवार,सुनिता शेजवळ,ताजुद्दीन मोमीन,श्री. लोखंडे,कलीम शेख आणि आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## श्री तुळजाभवानी देवीजींची सिंहासन पूजा : माहे जुलैचे ऑनलाईन नोंदणी वेळापत्रक निश्चित

धाराशिव (जिमाका) महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी देविजींच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगना व इतर राज्यातून भाविक कुलदेवता असल्याने या ठिकाणी कुलाचार व कुलधर्म करण्यासाठी मोठ्या संख्येने भक्तिभावाने येतात.

श्री देविजीची सिंहासन पुजा ही अत्यंत महत्वाची मानली जाते. ही सिंहासन पुजा नोंदणी ऑनलाईन पध्दतीने श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर https://online.shrituljabhavani.org उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

माहे जुलै २०२६ मधील सिंहासन पुजा ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येईल याची सर्व भाविक भक्त,महंत,पुजारी,सेवेकरी व नागरीकांनी नोंद घ्यावी. भाविकांनी सिंहासन पुजा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अधिकृत संकेतस्थळ https://online.shrituljabhavani .org यावर सिंहासन पुजा नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

माहे जुलै - २०२६ या महिन्यात सिंहासन पूजेच्या नोंदणीसाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.भाविकांनी सिंहासन पूजेसाठी http://online.shrituljabhavani.org या लिंकवर प्रवेश करून भाविकांनी आपली सिंहासन पुजेची नोंदणी करावी.

सिंहासन पुजा नोंदणी १९ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजतापासून सुरू झाली आहे.ती २४ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजतापर्यंत करता येईल. ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने प्रथम सोडत व भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस २७ जून २०२६ रोजी ११ वाजता पाठविण्यात येतील. भाविकांनी प्रथम सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २७ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजतापासून ते २८ जूनपर्यंत सकाळी १० वाजतापर्यंत करावे.



सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पद्धतीने व्दितीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २८ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत एसएमएस पाठविण्यात येतील.

भाविकांनी व्दितीय सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २८ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते २९ जून रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करावे. प्रथम व व्दितीय फेरीत सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने तृतीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २९ जून रोजी सकाळी ११ वाजतापर्यंत एमएमएस पाठविण्यात येतील.

भाविकांनी तृतीय सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २९ जून रोजी सकाळी ११ ते ३० जून रोजी सकाळी १० वाजतापर्यंत करावे.

माहे जुलै -२०२६ या महिन्यातील अंतीम सिंहासन पुजा बुकींग झाल्याची यादी ३० जून रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रसिध्द करण्यात येईल.

भाविकांनी वरीलप्रमाणे सिंहासन पुजा नोंदणीचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर, संस्थान तुळजापूरच्या व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आधार,मोबाईल व ग्रीस्टॅक क्रमांक सादर करावे.जिल्हा उपनिबंधकांचे आवाहन ; बँकांशी दोन दिवसांत संपर्क साधावा

धाराशिव, (जिमाका) राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना - २०२६' मंजूर केली असून,योजनेची अंमलबजावणी सध्या राज्यभर सुरू आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना अल्पमुदतीच्या पीक कर्जातून दिलासा देण्यासाठी कर्जमुक्तीचा लाभ प्रदान करण्यात येत आहे.

योजनेनुसार,ज्या शेतकऱ्यांनी दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत अल्पमुदतीचे पीक कर्ज घेतले असून त्यांची कर्जखाती दि.३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत आहेत तसेच दि.३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नाही,अशा शेतकऱ्यांच्या एक किंवा अधिक बँकांमधील कर्ज खात्यांवरील मुद्दल व व्याजासह एकूण थकबाकी रक्कम दोन लाख रुपयांपर्यंत असल्यास त्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकीत रक्कम दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे,त्यांनी प्रथम दोन लाख रुपयांवरील अतिरिक्त थकबाकी संबंधित बँक किंवा संस्थेकडे जमा करणे आवश्यक आहे.ही अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.अतिरिक्त थकबाकीची परतफेड केल्यानंतर संबंधित पात्र शेतकऱ्यांना एकवेळ समझोता (जढड) योजना अंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ देण्यात येणार आहे.

दरम्यान,कर्जमुक्ती व एकवेळ समझोता योजनेस पात्र शेतकऱ्यांची माहिती शासनाने उपलब्ध करून दिलेल्या विशेष पोर्टलवर भरण्याचे काम संबंधित बँका आणि संस्थांकडून सुरू आहे.ही प्रक्रिया निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याबाबत शासनाकडून निर्देश देण्यात आले आहेत.

मात्र,अनेक पात्र शेतकऱ्यांचे आधार क्रमांक,मोबाईल क्रमांक आणि ग्रीस्टॅक क्रमांक उपलब्ध नसल्याने पोर्टलवर माहिती नोंदविण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे.त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपले आधार क्रमांक,मोबाईल क्रमांक तसेच ग्रीस्टॅक क्रमांक तातडीने संबंधित बँक किंवा संस्थेकडे उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी संबंधित बँक शाखा व्यवस्थापक अथवा संस्थेच्या सचिवांशी पुढील दोन दिवसांत यासाठी संपर्क साधून आवश्यक माहिती सादर करावी आणि शासनाच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळवावा,असे आवाहन जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धाराशिव यांनी केले आहे.

## हायकोर्ट एक्सप्रेस की मृत्यूची घंटा? टायर जळाले, बस पंचर झाली... तरीही डेपो प्रशासन गाढ झोपेत?



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- तुळजापूर तालुक्यातील एसटी महामंडळाच्या भोंगळ आणि निष्काळजी कारभाराचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तुळजापूर डेपोची हायकोर्ट एक्सप्रेस (छत्रपती संभाजीनगर-तुळजापूर) ही बस रात्रीच्या वेळी चौसाळ्याजवळ अचानक पंचर झाली. मात्र, हा केवळ पंचरचा प्रकार नसून बसच्या टायरांची अत्यंत दयनीय अवस्था पाहता प्रवाशांच्या जीवाशी सुरू असलेल्या खेळाचा प्रकार उघडा पडला झाला आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बसचे टायर इतके खराब झाले होते की, गरम होऊन टायर जळण्याची वेळ आली होती. बसमध्ये अग्निशमन यंत्रणा किंवा अन्य सुरक्षा उपायांची पुरेशी व्यवस्था नसल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**रोजचाच समस्शस, पण जबाबदार कोण?**

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, तुळजापूर डेपोतील अनेक बस रोजच पंक्चर होतात, धूर सोडतात किंवा रस्त्यात बंद पडतात. तरीसुद्धा वाहनांची योग्य तपासणी, टायर बदल किंवा देखभाल याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.

रात्रीच्या वेळी निर्जन ठिकाणी बस अडकल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे प्रचंड हाल झाले. अखेर प्रवाशांना रस्त्यावरच थांबून मदतीची वाट पाहावी लागली.

**हायकोर्ट एक्सप्रेस की हाय रिस्क एक्सप्रेस?**

एसटी महामंडळ प्रवाशांच्या सुरक्षिततेचे गोडवे गात असताना प्रत्यक्षात मोडकळीस आलेल्या बस रस्त्यावर धावत आहेत. लाखो रुपयांचा महसूल गोळा करणाऱ्या महामंडळाकडे प्रवाशांच्या जीवापेक्षा जुनाट टायर आणि भोंगळ देखभाल अधिक महत्त्वाची झाली आहे का, असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

तुळजापूर डेपोतील सर्व बसांची तातडीने तपासणी करावी. जीर्ण व धोकादायक टायर त्वरित बदलावेत. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. रात्रीच्या बस सेवांमध्ये सुरक्षा साधनांची उपलब्धता सुनिश्चित करावी अशी जाहिर मागणी आहे

तुळजापूर डेपोच्या या भोंगळ कारभारामुळे एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त प्रश्न आता सर्वसामान्य प्रवासी उपस्थित करत आहेत.

## तुळजापुरात पावसाळापूर्व नालेसफाईला प्रारंभ:आगामी १५ दिवसांत शहरातील नालेसफाईसह इतर कामे पूर्ण करण्यात येणार-नगराध्यक्ष विनोद गंगणे



तुळजापूर पावसाळ्या पूर्वीचा शहरातील नालेसफाई ला प्रारंभ करण्यात आला आहे. जेसीबी, ट्रॅक्टर चा सहाय्याने तुंबलेल्या गटारीसह झाडे - झुडपे काढण्यात येत आहेत. आगामी १५ दिवसांत शहरातील नालेसफाई ची कामे पूर्ण करण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी स्पष्ट केले आहे.

शहरातील तुळजापूर खुर्द परीसरात नालेसफाई चा कामांना प्रारंभ करण्यात आला आहे. तुळजापूर खुर्द रोड लगतचा मोठ्या नाल्याची सफाई करण्यात आली आहे. याशिवाय शिंदे प्लॉटींग, तुळजाई नगर, पांडुरंग नगर, सारा गौरव आदि भागातील तुंबलेल्या गटारी साफ करण्यात आल्या आहेत. परीसरातील रस्त्याचा कडेची झाडे - झुडपे काढण्यात येत आहेत. दररोज दोन शिफ्ट मध्ये २५ कर्मचाऱ्यांसह एक जेसीबी, ०३ ट्रॅक्टर नालेसफाई चा कामाला लावण्यात आले आहेत. दरम्यान शहरातील भीमनगर, आराधवाडी, मातंग नगर, भोसले गल्ली, खडकाळ गल्ली आदि भागातील साफसफाईची कामे यापूर्वीच पूर्ण करण्यात आली असून, उर्वरित भागातील नालेसफाई आगामी १५ दिवसांत पूर्ण करण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष गंगणे यांनी स्पष्ट केले आहे.

घरात पाणी घुसण्याचे प्रकार शहरातील आराधवाडी, भिमनगर, पंढरपूर गल्ली, साळुंके गल्ली, जिजामातानगर, मंगळवार पेठ आदि भागात पावसाळ्यात गटारी तुंबून घरात पाणी घुसण्याचे प्रकार गेल्या वर्षी पावसाळ्यात घडले होते. या पार्श्वभूमीवर पालिकेने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

हद्दवाढ भाग समस्यांच्या विळख्यात, १२ वर्षांपासून कोणाचे लक्ष नाही शहरातील गवते प्लॉटींग, आपसिंगा रोड सह नळदुर्ग रोड वरील हनुमान नगर, हेलिपॅड, जलशुद्धीकरण केंद्र, लातूर रोड आदी हद्दवाढ भागात नालेसफाई करण्याची मागणी होत आहे. गेल्या १२ वर्षांपासून हद्दवाढ भाग रस्ते, गटारी आदी सुविधांपासून वंचित आहेत. त्या भागातील नागरिकांनी सफाईची मागणी केली आहे.

## दोन बॅटऱ्या, टुल बॉक्स व ओरल बॉक्स १५० लिटर डिझेलची चोरी

तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मनोहर बाबु चव्हाण, वय ६० वर्षे, व्यावसाय गुत्तेदार रा. होटगी स्टेशन फताटेवाडी सोलापुर ता. दक्षिण सोलापुर जि. सोलापुर यांचे भांतब्री शिवारात ता. तुळजापूर येथे दि. १७.०६.२०२६ रोजी चैन पोकलॅन मशीनचे असेम्बली ईलेक्ट्रीक होडांई २/१०, दोन एक्साईड कंपनीच्या दोन बॅटऱ्या, टुल बॉक्स व ओरल बॉक्स १५० लिटर डिझेल असा एकुण ९२,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला.

अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मनोहर चव्हाण यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

